विना सहकार नही उध्दार !

# अर्चनानगर सहकारी गृहरचना संस्था मर्यादित

३९/२/२, एरंडवणा, पुणे-४११०३८.
नोंदणी क्र.: पी.एन.ए./एच.एस.जी./(टी.सी.)/१७०७/१९८९-९० दि. २७/१०/१९८९
Email : archananagar.chs @gmail.com

जा. क्र. 2024-25/27 दि. 3.2.2025

**संस्थेच्या पुनर्विकासाबाबत कार्यकारी समिती व पुनर्विकास समिती यांच्या दिनांक २ फेब्रुवारी २०२५ रोजी संध्याकाळी ६ वाजता झालेल्या संयुक्त सभेचे इतिवृत्त**

अर्चना नगर सहकारी गृहचना संस्थेच्या पुनर्विकास बाबत प्राप्त निविदांच्या अनुषंगाने यापूर्वी शॉर्टलिस्ट केलेल्या ५ विकसकांबाबत व तदनंतरच्या कार्यपद्धती बाबत दिनांक ३ जानेवारी २०२५ रोजी झालेल्या संयुक्त सभेचा इतिवृत्तान्तद्वारे यापूर्वी सर्व सदस्यांच्या माहितीसाठी कळविण्यात आले आहे.

त्यास अनुसरून दिनांक ३ जानेवारी २०२५ रोजी झालेल्या सभेत ठरल्यानुसार यापूर्वी शॉर्टलिस्ट केलेल्या ५ विकासकांबाबत समितीने निर्धारित केलेल्या विविध पॅरामीटर्सचे अनुषंगाने गुणांकन निश्चितीसाठी सबंधित विकसकांच्या विविध प्रकल्पांना कार्यकारी समिती व पुनर्विकास समितीच्या सदस्यांनी प्रत्यक्ष भेटी दिल्या आहेत. या भेटीसाठी प्रत्यक्ष उपस्थित असलेल्या दोन्ही समितीतील सदस्यांनी प्रत्येक विकसकाचे त्यांचे मते गुणांकन केले आहे. या गुणांकनाचा संकलित विचार करून त्याचे यापूर्वी ठरल्यानुसार प्रत्येक पॅरामीटरचे व्हेटेड गुणांकनाप्रमाणे यापूर्वी शॉर्टलिस्ट केलेल्या ५ विकसकांपैकी ३ विकसकांची नावे संयुक्त समितीने सर्वानुमते प्रथमतः शॉर्टलिस्ट केली. या सभेसाठी दोन्ही समितीतील 17 सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

त्यानंतर संध्याकाळी ६ वाजता श्री. ढेरे यांच्या कार्यालयात संयुक्त समितीचे सदस्य व श्री ढेरे यांची संयुक्त सभा घेण्यात आली. प्रथमतः श्री. ढेरे यांनी त्यांचे विश्लेषणानुसार यापूर्वी निवडलेल्या ५ विकसकांपैकी शॉर्टलिस्ट करावयाच्या ३ विकसकांची नावे सदस्यांना सांगितली. संयुक्त समितीने निवडलेले विकसक व पीएमसीने निवडलेले विकसक सारखेच असल्याने त्यांची निवड पुढील प्रक्रियेसाठी निश्चित करण्यात आली. सदर शॉर्टलिस्ट केलेल्या तीन विकसकांचे नावे खालील प्रमाणे,

१. रुही मंगलम असोसिएट्स

२. संचेती स्पेसेस

३. डी अँड टी प्रॉपर्टीज

उर्वरित ज्या २ विकसकांची नावे शॉर्टलिस्ट होऊ शकली नाहीत त्यांना तसे कळवावे व त्यांची सुरक्षा रक्कम परत करावी, असे ठरले. ज्यांची नावे शॉर्टलिस्ट झाली आहेत त्या विकसकाला सुद्धा याबाबत अवगत करून पुढील प्रक्रियेविषयी कळवावे, असे ठरले.

यापूर्वी ठरल्यानुसार शॉर्टलिस्ट केलेल्या ३ विकसकांच्या विविध प्रकल्पांना अर्चना नगर संस्थेतील सर्व सदस्यांनी भेटी देण्यासाठी पुढील कार्यक्रमाचे नियोजन त्वरित करावे, असा निर्णय घेण्यात आला. तत्पूर्वी संस्थेची विशेष सर्वसाधारण सभा दिनांक २३ फेब्रुवारी २०२५ रोजी आयोजित करावी त्यात कार्यकारी समिती व पुनर्विकास समितीने आतापर्यंत केलेली कार्यवाही सर्व सभासदांना विषद करावी, असे ठरले.

संस्थेच्या पुनर्विकासाचे कामकाजात पुनर्विकास समिती व कार्यकारी समिती मधील सर्व सदस्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेऊन दिलेल्या सकारात्मक प्रतिसादाबद्दल मा. अध्यक्षांनी सर्व सदस्यांचे आभार मानले व सभा संपन्न झाली.

अर्चनानगर सह. गृहरचना संस्था मर्यादित

सचिव

अर्चनानगर सह. गृहरचना संस्था मर्यादित
रजि. नं. पीएनए/एचएसजी/टी सी/१७०७ १९८९-९०
पुणे-४११०३८